**Golden Research Thoughts**
International Recognition Multidisciplinary Research Journal
ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 9 | March - 2016

# आधुनिक साहित्य आणि स्त्रीवादी अभ्यास आव्हान



प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

## प्रास्ताविक

सामाजिक आणि राजकीय वास्तव झपाट्याने बदलत असताना समाजाची व कुटुंबाची केंद्रबिंदु असलेली स्त्री जागृत होत आहे. स्त्री सर्वांगानी समाजाच्या सर्व पक्षांशी जोडलेली आहे. वर्चस्वव्यस्थांचा विरोध आणि अस्वीकार करीत असली तरी आहे तेच आपली नियती मानून कुठेतरी त्यातच समाधान शोधण्याचा प्रयत्नात ती असते. तिच्या उक्तीत आणि कृतीत दुटप्पीपणा येतो तो नियती मानणे आणि पूर्वापार चालत आलेल्या बंधनात स्वत:ला बांधून घेऊन त्या बंधनांची स्वामिनी होऊन हुतात्मा गौरव प्राप्त करणे यामुळे.

## स्त्रीवादी साहित्य

स्वत:ची जमीन व स्वत:ची दुनिया शोधून काढण्याची नवी व वेगळी जाणीव बाळगून परंपरेने लाभलेल्या भूभागाला चिकटून न राहण्याची जिद्द व उत्सुकता ज्या स्त्रीलेखनात आविष्कृत होते त्याला स्त्रीवादी साहित्य म्हणावे लागेल. ज्यातून अबोध मनाचे, दबलेल्या आपल्याच अन्य व्यक्तिमत्वाचे, अंत:करणाचे भाषिक प्रकटीकरण करण्याची मोकळीक व संधी तिला मिळते. इतिहासाशी, भूतकाळाशी, वांशिक व सामाजिक परंपरेशी असणाऱ्या आपल्या नात्याचे स्वरुप जाणून घेऊन ते नाते वेगळ्या परिप्रेक्ष्यात बघण्याचा प्रयत्न लेखिकेकडून स्त्री-साहित्यात केला जातो. म्हणूनच या प्रयत्नांची दोन रुपे स्त्रीवादी साहित्यात व्यक्त होतात.

१. स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारांचे चित्रण करताना ते का होतात, का सहन केले जातात यांचे विश्लेषण करण्याचा सक्षम प्रयत्न आणि वास्तव उपाय शोधण्याचा वा देण्याचा प्रयत्न.
२. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत आपल्याला असणारे जे स्थान आज आहे ते उद्या बदलले तर आपण कुठे असू याचा शोध घेण्याचा वैचारिक प्रयत्न.

## पुरुषी मन आणि स्त्री मन

स्वशरीरनिष्ठ अनुभवांचे वैविध्य हे स्त्रियांच्या अनुभवसृष्टीचे वेगळेपण आहे. स्त्रियांची शारीरिक व मानसिक वृत्ती ही जन्म देण्याची असते. दुसऱ्याला स्वत:त सामावून घेण्याची, रुजविण्याची, वाढविण्याची, सृजनाची असते. पुरुषीवृत्तीत प्राधान्य असते ते अहं ला आणि महत्त्वाकांक्षे ला. स्त्री-पुरुषातील या नैसर्गिक शरीरभेदाचा विचार स्त्रीवादी साहित्य विचारात महत्त्वाचा मानला जातो. शो वॉल्टरने अशा स्त्रीविशिष्ट अनुभव आकलनासाठी चार नमुने सुचविले आहेत -
१. स्त्री शरीरनिष्ठ अनुभवांचे आकलन.
२. स्त्रीनिष्ठ मनोविश्लेषण.
३. स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्तीचे आकलन.
४. स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभवविश्वाचे अर्थ निर्णयन.

याद्वारे निर्मितीप्रक्रिया कल्पनाशक्ती वाङ:मयीन् व्यक्तिमत्त्व यांचा समग्र वेध घेता येतो.

## नवी भाषा, नवी शैली

आपल्या धारदार जाणिवांची तीक्ष्णता वाचकांपर्यंत संप्रेषित करण्यासाठी साहित्यिकाला अविष्कार करावा लागतो. गुळगुळीत अर्थ, बधीर भाषेचा वापर टाळून, जिवंत रसरशीत, नूतन सकस भाषा, नवी शैली साहित्यात अविष्कृत होते. विषयाबरोबरच शैली, वाङ्:मयप्रकार, घाट, आकृतिबंध यांची चिकित्सा स्त्रीवादी साहित्याचे मूल्यांकन करण्यासाठी महत्त्वाचे निकष आहेत. स्त्रीवादी लेखिकांनी समीक्षकही होणे गरजेचे आहे. त्यातून या लेखनावर पडणाऱ्या मर्यादा, बंधन यांचे स्वरुप स्पष्ट होईल. स्त्रियांच्या निर्मितीक्षमतेची मानसिकता उलगडण्यास मदत होईल.

स्त्री-शरीरनिष्ठ अनुभवांचे आकलन

शिवप्रिया सुर्वे यांची घर संसार वजा जाता तिथे असे उरते काय, विद्युलता अकलूजकरांची कलमी रोपटी, हेमा लेलेंची प्रिय, आश्विनी धोंगडेची बातम्या, संजीवनी बोकीलांची छाप आदि काय, वासंती मुजुमदारांची जन्मामागे जन्म, सुलभा हेर्लेकरांची एक दिवली तेवते आहे, प्रतिभा महाजनांची स्त्री, अंजली पेंडसेची छेद मनाचे, पद्मा गोळेंची वस्तू, मल्लिका अमरशेखची वादळ, लक्ष्मणरेषा किंवा नीरजा यांच्या कविता. अशा अनेक कवयित्री स्त्रीवादी साहित्यांचे दालन समृध्द करताना दिसतात.

आश्विनी धोंगडेंची स्त्रीसूक्त मधील कविता स्त्री-मुक्तीची कविता आहे. त्यामुळे इथले प्रेमही वेगळ्या अंगाने येते. प्रेमाआधी वासनेचाच स्पर्श तिला होतो. कोणी चुटपुटत्या स्पर्शासाठी गर्दीत चाटून जातो. कोणी फोनवर समाधान मानतो. सहवासाची ऊब पितो. (स्त्री : ४) सोळा वर्षापूर्वी डोळ्यात स्वप्ने घेऊन आलेली एक भावुक तरुणी इथं आली होती. तिच्याऐवजी आता त्या घरात एक मिनी कॉम्प्युटर जगतोय. (ती एक मिनी कॉम्प्युटर : १५) लग्न झाल्यावर ती भाड्याच्या दोन खोल्यातून पाच रुम्सच्या अलिशान फ्लॅटमध्ये रहायला आली. त्याला काय हवे हाच विचार प्रधान झाला. त्याच्या साच्यात तिला स्वत:चे आयुष्य वेतून घ्यावे लागले. (कॅक्टस : १७) लग्नानंतर तिच्या लक्षात येते की पळता पळता ती शंभर मैल पळून गेली तरी तो मात्र आहे तिथेच आहे अजून तसाच (शंभर वर्षे : २०) बायकोने फक्त सदा ताजे टवटवीत रहावे, आजारी पडू नये, मित्रांशी बोलू नये, म्हातारे दिसू नये. नवऱ्यापेक्षा उंच होऊ नये, अशी त्यांची अपेक्षा असते. (बायको : २३) घरातल्या सगळ्यांचा तिच्यावर हक्क असतो पण तिचा कुणावर हक्क नसतो. (गृहिणी : ३१)

तो आरशात पाहतो तेव्हा
त्याला दिसतो
जसा तो असतो
ती आरशात पाहते जेव्हा
तिला दिसते
जसी ती नसते (प्रतिबिंब : ४४)

प्रेमाच्या नावाखाली स्वत्वाला तिलांजली देऊ नये असे तिला वाटते. स्पर्शाचे अर्थ विसरून जाऊन एकदातरी तिला मोकळ्या श्वासाने माणूस म्हणून जगायचे आहे. तिला वाटते. एकदी तरी त्याने खांद्यावर मान टाकून आधाराला यावे आणि तिच्या कर्तुत्त्वाचे पोवाडे पुरुषी अस्मिता विसरुन त्याने गावे.

अनुराधा पाटलांच्या कवितेत तिला हेही ठाऊक आहे की तिचे त्याच्यावरचे प्रेम ही गोष्ट काही जगावेगळी किंवा एखादी अदभुत गोष्ट नाही.

मातीवर आणि माणसांवर प्रेम करताना
हळुहळु संपत जाणाऱ्यांच्या
कितीतरी कहाण्या कोणत्याही काळात
सगळ्यांनाच माहीत असतील (तरीही : २.३)

साऱ्यांशी बांधले जाऊनही आपण एकाकीच उरतो हे तिने समजुन घेतलेले आहे.

कुणी लकेर छेडतं आणि झणझणते
मी पणाची ताणलेली तार चालता चालता
तुला समजून घेणं हा तर
मी माझा सतत घेतलेला शोध होता. (तरीही १४-१८)

सुलभा हेर्लेकरांच्या कवितेत (आसरा : ३०) त्याने त्याच्या कवेचा आसरा तिला देऊ केला आणि वाटेवर मात्र डोळ्यांनी प्यायलेल्या गुरुचरित्राच्या कमंडलुतले थेंब थेंबत गेला. एकेकट्या दु:खातून तीच वाजत आहे. (संदर्भ : १०) तिने तर रक्ताचे शरीरच त्याला बहाल केले होते पण तो कधी आपलेपणाने तिच्यातून वाहिलाच नाही.

तुझ्यासाठी रंग सजवताना
किती शरण आणलेस...
आता वर पाहिले तरी
तोल जातो
खाली दरीचे काय सांगावे? (तोल : ११)

कुठल्याही वणव्यात जळताना त्याला हाक द्यावीशी वाटत नाही कारण तीच स्वत:च्या शोधात (मनाचे) तळघर उतरुन पाऊसभर होते. (तळघर : उतरुन : २५) विचार करताना अनेक गोष्टी लख्खकन समोर येतात.

तुझ्या मनाचा बाह्य झगमगाट
नी आताच्या मोडक्या भिंती...
स्वत: बद्दलचा तीव्र अहंकार
आणि इतरांबद्दलची आत्मकेंद्रित उदासीनता

पण तिला आता बदलायचे आहे. आकाश व्हायचे आहे. (वाद : ३०)

हेमा लेलेंच्या कवितेत ते दोघेही एकमेकांना आणि आयुष्यालाही देहाच्या वाटेने देठांपर्यत भिडतात (प्रिय : १२) ज्याच्याजवळ सर्वस्व पणाला लावून जाता येते. त्याला दुरुन बघण्याचे सामर्थ्य कमावणे फार अवघड असते पण तिला ते जमले आणि जवळीकीमुळे एकमेकांना येणारा बहर ते दुरुनही अनुभवू शकतील असे तिला वाटते. (प्रिय : २७)

एकमेकांसाठी शिकून घ्यायचे तपशील आपण सराईतपणे वागवू लागतो मनात नि शरीरात अजूनही आपण तसे कुणीच नसतो इतरांसाठी पण एकमेकांना सोडून (प्रिय : २५)

मल्लिका अमरशेखांच्या कवितेतून प्रियकरापासून निखळून पडलेले परकेपण दिसते. अनेक अर्थाची प्रियतम नाती गळून गेलेले भयानक एकाकी स्त्रीमन येथे सूचित होते.

आता गोव्याच्या समुद्राला किनाराच नाहीय
आणि आता माझ्या शरीरातून एक वाळूचा प्रियकर
खाली घरंगळत नाहीसा होत चाललाय.. (वाळूचा प्रियकर : ६५)

अरुणा ढेरेंच्या कवितेत निसर्ग जसा विनासायास एकमेकांना समजून घेतो तसे दोघांनी एकमेकांना समजून घ्यावेसे वाटते. (यक्षरात्र : समजून घ्यायला हवं : १७) या देहस्वी प्रदेशाशिवाय दुसरीकडे कुठे तृप्ती असेल असे वाटलेच नव्हते पण आता तो नाही तेव्हाही तिचे जगणे सहज आहे. हे तिला खूप महत्त्वाचे वाटते. ते ऊनही तिला हवेसे आहे, हे निरामय आहे. (यक्षरात्र : तू नसताना तिला हा शोध लागतो आणि या आत्मशोधाने तिचे अस्तित्त्व उजळून निघते. इतर प्रेयसीप्रमाणे ती विरहाची गाणी गात बसत नाही. तिचा एक शब्द तिने त्याला दिल्यावर तिचे विश्व संबंध (बंधासहित, संपूर्णपणे) हलले. तो तर तिचे गाणेच मागतोय. त्यासाठी तिला सगळ्या मागच्या जन्मांचे बळ गोळा करायला पाहिजे. (यक्षरात्र : पुन्हा गाण्यासाठी : १९) एका अटळ आवश्यकतेच्या भूमीवरुन देण्याघेण्याचे भौतिक मार्ग लांब ठेवून, आंतरसंबंधांची सामाजिक जबाबदारी काळजीपूर्वक निभवायचे ठरवून त्यांच्यातला ह्या नात्याचा प्रवास सुरु होतो.

आपले नाते हे असे आहे...
हे ज्ञान आपल्याला होतेच ना!
तरी कसे पाहता पाहता

हातामधून आपले माणूस सुटून जाते!
जाता जाता अंगावरचे सारे मोहर खूडून नेते
अगदी मोकळ्या देहावरचे सुकत येतात व्रण
तरी कशी अमिट थरथरते
आंतरसंबंधाच्या सामायिक जबाबदारीची
ही खोल आठवण (यक्षरात्र : आठवण : ७८)
तिच्या हाती प्रेमासाठी ओठ मिटून घेणे फक्त उरते.
मी नखलत नाही शिरा कोवळ्या ओल्या
दूमडून कडांना दुखवत नाही देठ
मी फक्त ठेवते उजेड हिरवा आत
अन प्रेमासाठी मिटून घेते ओठ (निरंजन : प्रेमासाठी : ६३)

कितीतरी सुखांवरुन उतरुन टाकलेल्या तिच्या दृष्टीच्या मीठमोहऱ्या तडतडतय नाहीत, जिवाला लागेलली रुखरुख कमी होत नाहीत, नात्यांच्या नसांमध्ये सारखं विष भिनत राहतं आणि त्याच्याबरोबर तिला जे वाटून घ्यायचे असतात. साधे साधे आनंद तेही वाटून घेता येत नाहीत. समजुतींच्या एकेका लहानशा देवघेवीसाठी प्राण पाखडावे लागतात तेव्हा भाषेला काही अर्थ असे असा विश्वास उरत नाही. (जावे जन्माकडे : कितीतरी सुखांवरुन : २५) जुईची वेल तोडली त्याला किती वर्ष झालीत पण अजूनही कधी कधी तिथली जमीन तिच्यात दुखते (जावे जन्माकडे : सांत्वन : ९०)

सगळ्यांनीच एक समंजस भान राखायला हवे, स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक आहेत. पूर्णत्त्वाचा ध्यास दोघांनाही असावा. पु. शि. रेगे म्हणतात तसं स्त्री बरोबर स्त्री होता आलं पाहिजे म्हणजे ती भरभरुन देते, मैत्र, समानधर्मी, सुहृद दोघांनीही एकमेकांसाठी असावं.

## संदर्भ

१) स्त्रीवादी समीक्षा - स्वरुप आणि उपाययोजन, डॉ. आश्विनी धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प. आ. ३१ जाने. १९९३.
२) स्त्रीवादी समीक्षा - डॉ. मंगला वरखेडे
३) स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, डॉ. शोभा पाटील, स्नेहवर्धन, पुणे, प. आ. १९ मार्च २००७.
४) सहकंप, अनुराधा पोतदार, मेहता प्रकाशन, पुणे ३०, प. आ. १५ डिसें. १९८२.